कुलवंतवाणी व वैश्यवाणी जातीचा इतर मागास-वर्गात समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,

शासन निर्णय, क्रमांकः सीबीसी-1496/प्र.क्र.38/मावक-5,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-400 032, दिनांक 21 ऑगस्ट, 1996.

**वाचा :-** (1) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांकः सीबीसी-1467/म, दिनांक 13 ऑक्टोबर, 1967.

(2) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांकः सीबीसी 1470/63117/ड-5, दिनांक 12 ऑक्टोबर, 1976.

(3) शासन पत्र, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक:सीबीसी-1489/6182/(40)/मावक-5, दिनांक 27 एप्रिल, 1989 व दिनांक 18 ऑक्टोबर,1989.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांकः सीबीसी 1470/63117/का-5, दिनांक 12 ऑक्टोबर, 1976 अन्वये काथार, काथार वाणी, कंठहार वाणी (लिंगायत वाणी व लाड वाणी सोडून) या जातीचा समावेश इतर मागासवर्गामध्ये करण्यात आला. त्यानंतर 'कुलवंत वाणी' व वैश्यवाणी' यांना सुध्दा काथार, काथारवाणी कंठहार वाणी प्रमाणेच जातीची प्रमाणपत्रे व सवलती मिळू शकतात असा खुलासा दिनांक 27 एप्रिल, 1989 च्या पत्र क्र.सीबीसी 1489/6182/(40)/मावक-5, अन्वये करण्यात आला. हा खुलासा दिनांक 18 ऑक्टोबर, 1989 च्या पत्रान्वये सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे निदर्शनास आणला जावा म्हणून जिल्हा दंडाधिका-यांना कळविण्यात आले. जाती प्रमाणपत्र निर्गमित करणा-या अधिका-याव्यतिरिक्त इतरांना हा खुलासा न केल्यामुळे त्या जातीच्या व्यक्तींना सेवेत प्रवेश करताना अडचणी उद्‌भवत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे कुलवंतवाणी व वैश्यवाणी या जातीचा समावेश दिनांक 27 एप्रिल, 1989 पासून केलेला आहे असे समजण्यात येऊन त्या जातीची नोंद पुढीलप्रमाणे सुधारित स्वरुपात नमूद करण्यात येत आहे, असा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

क्र.190- 'काथार, काथारवाणी, कंठहारवाणी, वैश्यवाणी, कुलवंतवाणी (लिंगायत वाणी व लाडवाणी सोडून)'

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स. नु. गावीत,

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

मुख्य मंत्र्यांचे सचिव,

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

महालेखापाल, महाराष्ट्र-1/2, मुंबई/नागपूर,

सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,

(200608201126550001)

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व जिल्हा दंडाधिकारी / उप जिल्हाधिकारी,
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी / सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल),
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
आयुक्त, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सह संचालक, (जाप्रत), समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेश त्यांचे अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणून द्यावेत.

सर्व कार्यासने, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
निवड नस्ती, कार्यासन मावक-5.

---

* पत्राद्वारे.